शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

प्रति,
मा.प्राचार्य/संचालक,
सर्व संलग्न महाविद्यालये/मान्यताप्राप्त संस्था,
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

महोदय / महोदया,

रिट याचिका क्र.१३३२/२०१६, शाहबाबू एज्युकेशन सोसायटी, जि.अकोला विरूध्द भारत सरकार व इतर च्या अनुषंगाने मा.शिक्षण संचालक तथा नोडल ऑफिसर, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी पाठविलेले क्र.उशिसं/शिष्य/न्या.प्र./या.क्र.१३३२/५०५२, दि.२०/०४/२०१७ चे पत्र व सदर पत्रासोबतचे Under Secretary to the Government of India, Ministry of Minority Affairs, New Delhi यांचे No.5-4/2016-SS, Dtd.05/04/2017 चे पत्र आपल्या माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित केले आहे. त्यानुसार शिष्यवृत्ती मंजूर झालेल्या विद्यार्थ्यांच्या खात्यात सदर शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाल्यानंतर त्या विद्यार्थ्यांनी सदर शिष्यवृत्ती रकमेतून महाविद्यालयाच्या प्रवेश शुल्क व शिक्षण शुल्काची रक्कम संबंधित महाविद्यालयाकडे १५ दिवसात जमा करावयाची आहे व असे न झाल्यास त्या विद्यार्थ्यांच्या नुतनीकरणाच्या अर्जावर संबंधित महाविद्यालय कार्यवाही करणार नाही, अशा सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात.

कळावे,

आदेशान्वये,

I/Cउपकुलसचिव

सोबत - वरीलप्रमाणे.

संदर्भ क्र. संलग्नता/टी-२/ १४
दि.: 25 APR 2017

प्रत - मा.शिक्षण संचालक तथा नोडल ऑफिसर, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना माहितीस्तव सादर.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११००१.
Web : www.dhepune.gov.in E-mail : scholarshiphd2@gmail.com
फोन नं. ०२०/२६१२६९३९ फॅक्स नं. ०२०/२६१११५३

क्र. उशिसं/शिष्य/न्या.प्र./या.क्र.१३३२/ ५०५२ दिनांक : २०.४.२०१७
महत्वाचे / न्या.प्रकरण/ कालमर्यादित

20 APR 2017

प्रति,

१)आयुक्त, कृषी आयुक्तालय,मध्यवर्ती इमारत,पुणे.
२)संचालक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, भांबुर्डा, पुणे.
३)कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य. (कृषी /अकृषी विद्यापीठ)

विषय : याचिका क्रमांक १३३२/२०१६
शाहबाबू एज्युकेशन सोसायटी जि.अकोला
विरुध्द
भारत सरकार व इतर

संदर्भ : १) केंद्रशासनाची अल्पसंख्यांक विभागाचे पत्र क्रमांक ५-४/२०१६-एसएस दिनांक ०५/०४/२०१७
२) शासनपत्र क्र.न्यायाप्र-१११६/प्र.क्र.८६/मशि-२, दि. १९/०४/२०१७.

उपरोक्त विषयाबाबतच्या संदर्भाधिन पत्रान्वये रिट याचिका क्र. १३३२/२०१६ बाबत केंद्रशासनाने त्यांचे दिनांक ०५/०४/१७ रोजीच्या पत्रान्वये निर्गमित केलेल्या सुचनानुसार व मा.उच्च न्यायालय, खंडपीठ, नागपूर यांचे दिनांक ०५/०४/१७ रोजीच्या निर्णयास अनुसरुन कळविण्यात येते की, जे विद्यार्थी महाविदयालयात प्रवेश घेताना महाविदयालयाच्या प्रवेश शुल्क व शिक्षण शुल्काची रक्कम महाविद्यालयात भरत नाहीत व अल्पसंख्यांक विदयार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करतात व ज्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती मंजूर होते अशा विदयार्थ्यांच्या खात्यात सदर शिष्यवृत्तीची रक्कम जमा झाल्यानंतर त्या विदयार्थ्यांनी सदर शिष्यवृत्ती रकमेतून महाविदयालयाच्या प्रवेश शुल्क व शिक्षण शुल्काची रक्कम संबंधित महाविदयालयाकडे १५ दिवसांत जमा करावयाची आहे व असे न झाल्यास त्या विदयार्थ्यांच्या नूतनीकरणाच्या अर्जावर संबंधित महाविदयालय कार्यवाही करणार नाही, अशा सूचना विदयार्थ्यांना देण्याबाबत कळविण्यात आलेले आहे.

तरी, सदर प्रकरणी आपणाकडून आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व पदविका /पदवी /पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या महाविद्यालयांना याबाबतच्या सूचना परिपत्रकाद्वारे ई-मेल वर तात्काळ आजच देण्यांत याव्यांत. संबंधित महाविदयालयांनी या शिष्यवृत्तीचे अर्ज भरलेल्या विदयार्थ्यांना दूरध्वनी/ एसएमएस/महाविद्यालयात नोटीस लावून अथवा पत्राद्वारे या सूचना विनाविलंब देण्याबाबत त्वरित योग्य ती कार्यवाही करावी असे कळविण्यात यावे.

आपण केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या संचालनालयास सादर करावा व ज्या महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे सूचना दिलेल्या आहेत त्या सर्व महाविद्यालयांची यादी या संचालनालयास सादर करावी. याबाबतची कार्यवाही न्यायालयीन प्रकरणी असून सदर माहिती शासनास सादर करावयाची असल्याने याबाबत प्राधान्याने कार्यवाही करावी ही विनंती.

(डॉ.धनराज माने)
शिक्षण संचालक तथा नोडल ऑफिसर
उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रत - मा.अप्पर मुख्य सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग,मंत्रालय,मुंबई-३२ यांना माहितीस्तव सादर.

Shivaji University, Kolhapur
Inward No.: 6647
Date 24/04/17

No. 5-4/2016-SS
Government of India
Ministry of Minority Affairs
(Scholarship Division)
****

11th Floor, Pt. Deendayal Antyodaya Bhawan
C.G.O.Complex, Lodhi Road
New Delhi-110003
Dated: 05.04.2017

To

Shri Sitaram Kunte,
The Additional Chief Secretary,
Higher & Technical Education Mantralaya,
Government of Maharashtra, Mumbai, Maharashtra-400032

**Subject: To issue an Advisory from Govt. of Maharashtra to the beneficiaries/students availing the benefit of Pre-Matric, Post Matric and Merit cum Means based Scholarship Schemes of this Ministry.**

Sir,

In view of the order of the Hon'ble High Court of Judicature at Bombay, Nagpur Bench, Nagpur dated 08/03/2017 (copy enclosed), Government of Maharashtra is requested to issue an Advisory to students to deposit the Admission and Tuition Fee components of their Scholarship Amount to their Institute/ College within 15 days of receiving of the Scholarship Amount in their respective Bank Account, failing which their renewal scholarship application shall not be considered/processed by their respective Institute/College during the next academic year.

Yours faithfully

(Suresh Yadav)
Under Secretary to the Government of India
Tel. 011-24302520

Copy to:

1. Shri Nadan Nangare, Director, Minority & Adult Education, 17, Dr. Ambedaker Road, Pune, Maharashtra-411001.

2. Shri Dhanraj Mane, Director, Directorate of Higher Education, Central Building, Pune, Maharashtra- 411001.

3. Shri Chandrashekhar Oak, Director, Directorate of Technical Education, 3, Mahapalika Marg, Opp. Metro Cinema, Mumbai, Maharashtra-01.

Copy also to:

Shahbabu Education Society, Patur, Tq. Patur Dist. Akola, Maharashtra -444501.